**राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत विविध अनुज्ञप्त्या**
**<u>मंजुरीच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमआयएस-०४१५/प्र.क्र.९०/राउशु-३,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २९ जानेवारी, २०१८.

**<u>प्रस्तावना</u> :-**

राज्य उत्पादन शुल्क विभाग हा राज्य शासनाचा राजस्व विभाग आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधील तरतूदीनुसार मद्य, मद्यार्क तसेच या बाबींसाठी लागणारे कच्चे साहित्य यांच्याशी संबंधित विविध अनुज्ञप्त्या मंजूर करण्याचे अधिकार या विभागास आहेत. राज्यातील उद्योग धंद्यामध्ये वाढ झाली असल्याने विविध औद्योगिक कारणास्तव राज्य उत्पादन विभागाच्या नियंत्रणाखालील मद्य, मद्यार्क तसेच या बाबींसाठी लागणारे कच्चे साहित्य यांचा वापर करणाऱ्या घटकांनी बाजारातील मागणीनुसार पुरवठा करण्याकरिता त्यांच्या उत्पादन क्षमतेत वाढ केली आहे. अशा घटकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी तसेच केंद्र शासनाच्या मेक इंडिया च्या धोरणास अनुसरून महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याकरिता आणि रोजगार निर्मितीच्या अनुषंगाने राज्यात नविन उद्योगधंद्यांची उभारणी व्हावी, यासाठी उद्योजकांना तसेच सामान्य जनतेस कमीत कमी त्रास व्हावा याकरिता वेगवेगळया स्तरावर घ्याव्या लागणाऱ्या परवानगीकरिता होणारा प्रशासकीय विलंब टाळणे आवश्यक आहे. तसेच, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कामकाज अधिकाधिक लोकाभिमुख व कार्यक्षम होण्यासाठी आणि त्याच अनुषंगाने राज्यातील मद्य निर्मिती व विक्री उद्योगाला उद्योगप्रिय वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी या विभागामार्फत प्रदान करण्यात येणाऱ्या विविध अनुज्ञप्त्यांच्या मंजूरीच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधील तरतूदीनुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियंत्रणाखालील मद्य, मद्यार्क तसेच या बाबींसाठी लागणारे कच्चे साहित्य यांच्याशी संबंधित विविध अनुज्ञप्त्या मंजूरीकरिता लागणारा कालावधी कमी करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अनुज्ञप्तीचा प्रकार | अनुज्ञप्ती प्रदान करण्याचे अधिकार |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ▶ **मळीबाबतची अनुज्ञप्ती :-** | | |
| १ | एम-१ | अनुज्ञप्ती प्रदान करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना यांना राहतील. |
| २ | एम-२ | पशुखाद्य निर्मिती घटकाच्या मळीचा वाढीव कोटा मंजूरीसाठी संबंधित जिल्हयातील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व जिल्हा उद्योग अधिकारी यांच्या शिफारशी नंतर वार्षिक २००० मे.टन वाढीव मळी कोटा मंजूर करण्याबाबत विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा. |

| अ.क्र. | अनुज्ञप्तीचा प्रकार | अनुज्ञप्ती प्रदान करण्याचे अधिकार |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | तसेच, घटकास २ महिन्याच्या कोट्याएवढा मळीचा तात्पुरता (Ad hoc) कोटा मंजूर करण्याबाबत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा. |
| **मद्य व मद्यार्क अनुज्ञप्ती :-** | | |
| १ | आरएस-१ | सदर अनुज्ञप्ती प्रदान करण्याचे अधिकार संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना राहतील. |
| २ | आरएस-२ | औद्योगिक मद्यार्काची अनुज्ञप्ती (RS-२) मंजूर करताना किंवा सदर अनुज्ञप्ती अंतर्गत मंजूर मद्यार्कापेक्षा अतिरिक्त परिमाणाची वाढ करण्यासाठी, वार्षिक ५ लक्ष लिटर पर्यंतचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत. |
| ३ | आरएस-६ आणि आरएस-६(अ) | अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना अधिकार विहीत करण्यात येत आहेत. |
| ४ | आरएस-७ | अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी संबंधित विभागीय उप आयुक्त यांना अधिकार विहीत करण्यात येत आहेत. |
| ५ | डीएस-५ | औद्योगिक विप्रकृत मद्यार्काच्या डीएस-५ अनुज्ञप्तीकरिता विप्रकृत मद्यार्काचा कोटा निश्चित करण्याचे किंवा मंजूर मद्यार्कापेक्षा अतिरीक्त/वाढीव परिमाण मंजूर करण्याचे, वार्षिक ५ लक्ष लिटर पर्यंतचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना राहतील. |
| ६ | डीएस-६ | अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी संबंधित विभागीय उप आयुक्त यांना अधिकार विहीत करण्यात येत आहेत. |
| ७ | डीएस-७ | अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी संबंधित निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना अधिकार विहीत करण्यात येत आहेत. |
| ८ | डीएसपी-१/ डीएसपी-२/ डीएसपी-३ | अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना अधिकार विहीत करण्यात येत आहेत. |
| **घाऊक विक्रीची अनुज्ञप्ती :-** | | |
| १ | एफएल-१ | अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना अधिकार विहीत करण्यात येत आहेत. |
| २ | एफएलडब्लू-१ | अनुज्ञप्ती प्रदान करण्याचे अधिकार शासनाच्या पूर्वमान्यतेने संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना राहतील. |
| **किरकोळ विक्री अनुज्ञप्ती :-** | | |
| १ | एफएल-४ | अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना अधिकार विहीत करण्यात येत आहेत. |

| अ.क्र. | अनुज्ञप्तीचा प्रकार | अनुज्ञप्ती प्रदान करण्याचे अधिकार |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | एफएलडब्लू-२ | अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी शासनाच्या पूर्वमान्यतेने संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना अधिकार विहीत करण्यात येत आहेत. |
| ३ | एफएलबीआर-२ | सदर अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी विभागीय उप आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना अधिकार विहीत करण्यात येत आहेत. |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०१२९११०७२७१२२९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Punam Hiraman Wagde

Digitally signed by Punam Hiraman Wagde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4f894edc0ea69760a3c1561515a6bf87, cn=Punam Hiraman Wagde
Date: 2018.01.29 17:34:23 +05'30'

**( पु. हि. वागदे )**
**सह सचिव, गृह विभाग.**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.मंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद, विधान भवन, मुंबई,
५) मा.राज्यमंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) प्रधान सचिव (राउशु) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई-२३,
८) सर्व विभागीय आयुक्त,
९) सर्व जिल्हाधिकारी,
१०) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
११) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
१२) कक्ष अधिकारी, गृह विभाग /राउशु-१ व राउशु-२,
१३) निवड नस्ती (राउशु-३).